12/2/17

2/6/7

PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 1, ISSUE 4

# स्त्रीवाद आणि स्त्रियांचे लेखन

प्रा. डॉ. सविता मा. पवार
कला व विज्ञान महिला महाविद्यालय
मेहकर, जि. बुलढाणा
महाराष्ट्र भारत

साहित्य आणि समाजाचा अतिशय जवळचा संबंध राहत आलेला आहे.समाजातील घडणाऱ्याघटनांचे प्रतिबिंब साहित्यामध्ये पडत असते. त्याचबरोबर साहित्यकृतीचा प्रभावही समाजावर पडत असतोयादृष्टीने विचार करता साहित्यकृती, समाज आणि संस्कृती यांचा अन्योन्य संबंध आहे. त्यामुळेसाहित्यप्रकारचा अभ्यास हा समाजनिरपेक्ष राहून करता येणार नाही. स्त्रीवादी साहित्याचा विचारहीसमाजसापेक्ष चौकटीत राहून करावा लागतो. स्त्रीजीवनाचा विचार करता स्त्रियांवर जी बंधने येत गेलीत्याला अनेक घटक कारणीभूत आहेत. पितृसत्ताक कुटुंबपध्दती, लिंगभेदावर आधारीत समाजरचना , जात, धर्म, वर्ग, प्रादेशिकता आणि प्रस्थापित व्यवस्था यातून स्त्रियांवर अनेक बंधने आली आहेत. विवाहसंस्थेला असलेल महत्व, देहविषयक पावित्र्याच्या कल्पना आणि आईपणाला मिळणारे नैतिक मूल्य यातून स्त्रियांचे दुय्यमत्व अधिकच घट्ट होत गेले. हे सारे स्त्रीजीवनावर प्रभाव टाकत राहिलेले आहेत, ज्यामुळे स्त्रीअस्तित्वाचे विसर्जन होत राहिलेले आहे.

स्त्रीवादी विचारधारेला स्त्रीचे होणारे शोषण, तिच्या अस्तित्वाचे, 'स्व' चे होणारे विसर्जन मान्य नाही. अशा व्यवस्थेच्या .विरोधात उभे राहण्याच्या विचारातून स्त्रीवादाचा जन्म झाला. समाजव्यवस्थेत परिवर्तन व्हायला पाहिजे आणि स्त्रियाला माणूस म्हणून प्रतिष्टा मिळाली पाहिजे. अशा व्यापक सामाजिक जाणिवेतून स्त्रीवादाचा उदय झाला आहे.स्त्रीवाद स्त्रियांच्या स्वातंत्र्य आणि समानतेची मागणी करतो.स्त्रीवादीविचारधारा प्रस्थापित रुढी, परंपरा आणि संस्कृती यांना छेद देते. स्वतःचा शोध घेण्याची स्त्रीवादीची भूमिका आहे. हा शोध आपण कोठे आहोत आणि आपल्याला काय हवे आहे, हे आजमावण्याचा आहे.

साधारणतः सत्तरीच्या दशकात टोवर्ड्स एक्वालिटी अर्थात 'समानतेकडे वाटचाल' या अहवालापासून आणि युनोच्या महिला दशकापासून स्त्रीवादाच्या चर्चेला सुरुवात झाली आहे असे म्हटले जाते परंतु ते मर्यादित अर्थानेच खरे आहे, असे म्हणता येईल. कारण यापूर्वी स्त्रियांमध्ये अशी वैचारिकता वा मानसिकतानव्हती, असे म्हणता येत नाही. अगदी थेरीगाथापासून ते स्त्रीसंतांनी लिहिलेल्या अभंगापर्यंत विचार केल्यास आपल्याला त्यामधून स्त्री म्हणून सोसाव्या लागणाऱ्या दुय्यमतेला अधोरेखित करणारी मानसिकता दिसते. स्त्रीसंताच्या अभंगरचनांमध्ये



Dec-16 - Feb17

330

~~226~~ 225

दुःखमुक्तीचा स्वर व्यक्त होताना दिसतो. संत गोरागोळ्याची पत्नीसोयराबाई, बहिण निर्मला, नामदेवाचीदासी जनी, संत बहिणाबाई या सा-या स्त्रिया त्यांच्या दुःखाबद्दल बोलताना दिसतात. "देहासी विटाळ म्हणती सकळ! आत्मा तो निर्मळ शुध्द बुध्द!!देहाचा विटाळ देहीच जन्मला! सोवळा तो झाला कवण धर्म?विटाळापासून उत्पतीचे स्थान! कोण देह निर्माण नाही जगी?" यातल्या विटाळाच्या संकल्पनेतून प्रस्थापित व्यवस्था आणि या व्यवस्थेतील विटाळ या संकल्पनेला बळी पडलेल्या स्त्रिया, त्याचबरोबर शुद्र-अतिशुद्र यांच्याविषयीचे विद्रोही भान दिसते. जनाबाई आपल्या अभंगामध्ये 'डोईचा पदर आला खांदयावरी' असे म्हणतात, तेव्हा त्यामध्ये सुध्दा प्रस्थापित व्यवस्थेविरुध्द भक्तीमार्गाने केलेला विद्रोह आहे.

अव्वल इंग्रजी काळापासून अनेक स्त्रिया कथा, कादंबरी, कविता, आत्मचरित्र, ललित निबंध इ. वाङमय प्रकारात लेखन करताना दिसतात. सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, लक्ष्मीबाई टिळक,बहिणाबाई चौधरी,कुसुमावती देशपांडे, विभावरी शिरूरकर, इंदिरा संत, पद्मा गोळे आदी स्त्री लेखिकांचे मराठी साहित्य विश्वात योगदान महत्वपूर्ण आहे.ताराबाई शिंदे यांना भारतीय स्त्रीवादाच्या प्रवर्तक मानले जाते. त्यांनी इ.स.1882मध्ये 'स्त्रीपुरुषतुलना'हा ग्रंथ लिहून स्त्रियांच्या होणा-या शोषणाची वैचारिक मांडणी केली. या ग्रंथामुळे ताराबाई शिंदे भारतीय स्त्रीवादाची मांडणी करणाऱ्या आद्य लेखिका ठरतात. स्त्रियांना दुय्यमत्व बहाल करणाऱ्या पुरुषप्रधान व्यवस्थेलाच त्यांनी काही प्रश्न विचारून या व्यवस्थेचा दुटप्पीपणा उघड केला. परवशतेच्या स्त्री प्रतिमा त्यांनी नाकारल्या. पतीला देव मानून त्याची सेवा करावी, त्याची आज्ञा पाळावी या पारंपरिक समजुतीला त्यांनी आव्हान दिले. कुटुंबात आणि समाजात स्त्रियांचे शोषण नियोजित पध्दतीने होत असते. पुरुषप्रधान व्यवस्थेत त्या पुरुषाच्या वर्चस्वाखाली संपूर्णपणे दबलेल्या असतात. त्यांच्या बाबतीत एक विशिष्ट वर्तनव्यवस्था काम करत असते, ती ठरलेलीच असते. या व्यवस्थेतच शोषणाची सर्व बीजे दडलेली असतात. ताराबाईंनी आपल्या या पुस्तकातून स्त्रियांच्या संदर्भातील या वर्तनव्यवस्थेला आव्हान दिले आहे.स्त्रियांमधील निर्णयाचा अभाव,संपत्तीव सत्तेवरील अभाव, स्त्रीपुरुषांसाठी दुहेरी नीतीमुल्ये, योनीशुचितेच्या कल्पना यांचा आधार घेऊन स्त्रियांचे शोषण कसे होते हे ताराबाईंनी स्पष्ट केले आहे. स्त्रीवाद स्त्री आणि पुरुष दोघासाठी ही सोयीचा आहे. पण तो प्रत्यक्षात आणायचा म्हटल्यास पुरुषांना त्यांच्यामध्ये खूप बदल करणे आवश्यक आहे परंतु त्यांची तशी बदलण्याची भूमिका नसते. ताराबाईंनी अनेक दाखले देऊन पुरुषांच्या भूमिकेला आव्हान केले आहे.

पती हाच परमेश्वर मानायचे तर त्याची वागणूकही परमेश्वरासारखीच असली पाहिजे अशी स्त्रीपुरुषसमानतेची भूमिका त्यांनी स्वातंत्र्यपूर्वकाळात घेतलेली दिसते. एक सावित्री आपल्या सौभाग्यासाठी यमामागे गेली आणि आपल्या पतीस तिने परत आणले परंतु पुरुषामध्ये आतापर्यंत एकतरी पुरुष बायकोच्या प्राणाकरिता यमदरबारात गेला काय? आपले सौभाग्य गेले म्हणून विधवांनी आपली तोंडे काळी करूनआयुष्यभर अंधारकोठडीत बसावे मग. पुरुषांनी आपले तोंड काळे करून अरण्यवासात का राहू नये? असे प्रश्न त्या उपस्थित करतात. आपल्या या ग्रंथातून स्त्रीशोषणाचे त्यांनी विश्लेषण केले आहे. स्त्रीला आपले शोषण होत आहे हे कळणे महत्वाचे असते



330

226

Scanned by TapScanner

PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 1, ISSUE 4

तरीच इतरांनाही त्याची जाणीव करून देणे महत्वाचे ठरते,यादृष्टिने ताराबाईनी मांडलेले स्त्रीवादी विचार महत्वाचे ठरतात. मराठीमध्ये कथा, कादंब-यांतून आणि चळवळीच्या माध्यमातून जो स्त्रीवादी विचार मांडला गेला आहे, त्यामध्ये वैफल्याचेच अंग ठळकपणे दिसते. विभावरी शिरूरकर, गौरी देशपांडे, सानिया, प्रिया तेंडूलकर,छाया दातार यांच्या साहित्याचा यादृष्टिने विचार करता येईल. विभावरी शिरूरकर, कुसुमावती देशपांडे यांच्या सारख्या लेखिका प्रौढ कुमारिकांचे प्रश्न, नोकरी करून पित्याचे घर चालवणाऱ्या स्त्रिया, त्यांचे शिक्षण यासारखे प्रश्न आपल्या लेखनातून मांडताना दिसतात. प्रेमविवाह, स्त्रीपुरुषसंबंध यासारखे विषयही त्यांच्या साहित्यातून येतात. विभावरींच्या स्त्रीपात्राचा विचार करता ती माणूस म्हणून नजरेत भरतात. मराठी कथाविश्वात आत्मभान जागृत झालेल्या स्त्रीचे दर्शन प्रथम विभावरींनी आपल्या कथांतून घडविले आहे.त्यांच्या कथांचे विषयही क्रांतीकारी स्वरूपांचे राहिले आहेत. आजच्या तुलनेत विभावरीच्या वेळची समाजाची आणि वाचकांची मानसिकता फारच संकुचित होती. स्त्रियांच्या शारीरतृष्णा आणि त्यातून उद्‌भवणारे मनाच्या उद्‌वेगाचे चित्रण एखादी स्त्री आपल्या साहित्यातून करते, ही गोष्ट अत्यंत प्रक्षोभक होती.'हिंदोळ्यावर' आणि 'कळयांचे निःश्वास' यासारख्या साहित्याकृती त्याकाळी समाजाकडून धुत्कारल्या गेल्या. भारतीय समाजरचना आणि त्यावर आधारित परंपरागत कुटूंबव्यवस्था आणि या व्यवस्थेकडून स्त्रीला स्वतंत्र मूल्य नाकारणे हे स्त्रीवादाचे मूळ राहिले आहे. पुरुषप्रधान संस्कृतीची नीतीमूल्ये ही पुरुषांच्या दृष्टिने सोयीची आहेत. त्यामुळे परंपरेने ती आली. त्यामध्येस्त्रीचा माणूस म्हणून कोठे विचार केलेला दिसत नाही. स्त्रीला माणूस म्हणून प्रतिष्ठा मिळायला हवी ही स्त्रीवादाची मुख्य विचारधारा आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही स्त्री पारतंत्र्यात जीवन जगत आहे. कुटुंबात तिची जी नाना प्रकारे घुसमट होते, त्यातून ही गोष्ट स्पष्ट होते. ज्योत्स्ना देवधर, वसुंधरा पटवर्धन, विजया राजाध्यक्ष ते आशा बगे, गौरी देशपांडे आणि सानिया यांच्या कादंबरी लेखनात ही स्त्रीवादी विचारधारा व्यक्त होतानादिसते.

गौरी देशपांडेयांचे कादंबरी क्षेत्रातील योगदान यादृष्टीने महत्वाचे आहे. त्यांच्या नायिका उच्चस्तरीय आहेत आणि स्त्रीविचारांशी घट्ट बांधिलकी मानणाऱ्या आहेत. मुक्त, धीट, स्वेच्छेने जगणारी स्वतंत्र विचाराची स्त्री त्यांनी रंगवली स्त्रीपुरुषसंबंधाकडे वेगळया नजरेने त्यांच्या नायिका पाहताना दिसतात. न्याय-अन्याय, नीती-अनीती याबाबतीत समाजाचे नियम मोडीत काढताना त्या दिसतात.त्यांच्या 'मध्य लटपटीत' ची नायिका म्हणते "आपल्याला हवं त्या माणसाबरोबर का राहू नये आपण? ज्याला करायच लग्न त्यांनी करावं- बाकीच्यांनी का?" अशा या स्त्रिया स्वयंनिर्णयी आहेत. स्त्रीचे माणूस म्हणून चिंतन गौरी देशपांडे यांच्या लेखनातून प्रकटताना दिसते. विवाहसंस्था आणि त्यातून स्त्रीला येणारे पारतंत्र्य गौरी देशपांडे यांनी रंगविलेल्या स्त्रिया नाकरतात.पुरुषांच्या लैंगिक तृष्णा भागवणे, त्यांचा वंशवाढविणे, त्यांचे घर सांभाळणे यातच स्त्रीजीवनाचा अर्थ शोधण्याचा परंपरागत दृष्टीकोन त्या धुडकावून लावताना दिसतात स्त्रीच्या सगळया संभ्रमाचे मूळ गौरी देशपांडे यांना आपल्या विवाहसंस्थेत आढळते.



Scanned by TapScanner

स्त्रीवादाच्या दृष्टीने कमल देसाई यांच्या साहित्याचा परामर्श घेणे महत्वाचे ठरते. स्त्रियांच्या बदलत्या जाणिवांचा आविष्कार त्यांच्या साहित्य कृतीतूनघडतो. त्यांचा 'रंग' हा कथासंग्रह,'रात्रंदिवस आम्हा युध्दाचाप्रसंग','काळासूर्य' व 'हॅट घालणारी बाई' या लघुकादंबऱ्या महत्वाच्या आहेत.'काळासूर्य' मधील स्त्री निर्भय आहे. ती एकटी आहे पण एकाकी नाही सर्व सामाजिक संकेतांना नकार देत ती स्वतःचा स्वतंत्र मार्ग निवडते. कारण तिला स्वतःच्या अनुभवातून मनोमन समजले आहे की मानवी स्वभाव हा फक्त निसर्गदत्त देहातून ठरत नसतो तर तो सामाजिक संस्कारातून घडविला जातो आणि जेमनुष्यनिर्मित आहे ते आपल्या ताकदीने नाकारता येते. याचाच अर्थ मानवनिर्मित रूढी, परंपरा, संकेत स्वसामर्थ्याने मिटवता येऊ शकतात असा विचार कमल देसाई आपल्या कादंबरीतून व्यक्त करतात

'हॅट घालणारी बाई' यामध्ये स्त्रीदेह अणि मन यांची फारकत केलेली दिसते. स्वतःच्या स्वातंत्र्यासाठी दिलेली ती किंमत आहे प्राप्त विषमव्यवस्थेमध्ये स्त्रीला स्वतंत्र्याच्या कोणत्या वाटा उपलब्ध आहेत याचा शोध कमल दसाई यांच्या कादंब-या घेतात. प्रस्थपित पुरुषप्रधान मूल्यव्यवस्थेचा प्रतिकार आपल्याला त्यांच्या कादंबऱ्यांतून दिसतो. कारण या व्यवस्थेच्या आधारेच स्त्रियांचे स्थान गौण ठरविले जाते. फ्रेंच स्त्रीवादी लेखिका ज्युलिया खिस्तेवा यांच्या मते बाई किंवा स्त्री या शब्दांचीरुढ व्याख्या स्वीकारणे आणि त्यानुसार आपण स्त्री किंवा पुरुष आहोत हे मान्य करणे यालाच एकप्रकारची अर्थहीनता आहे, म्हणून ही पुरुषप्रधान मूल्यव्यवस्था उलथवून टाकण्याचे प्रयत्न करणारे साहित्यच स्त्रीवादी मानले जावे असाही त्यामागे एक आग्रह दिसतो. यादृष्टीने पाहता व्हर्जिनिया वुल्फची 1929 साली प्रसिध्द झालेली 'आपली स्वतःची जागा' ही कादंबरी स्त्रीवादी साहित्यातील एक महत्वाचा टप्पा मानली जाते.

मेघना पेठे यांच्या साहित्याचा विचार करता एक प्रखर व्यक्तीवाद स्वीकारणारी स्त्री त्यांनी आपल्या साहित्यातून रंगविली आहे 'नवरा हा विरजनापुरता' असे रोखठोक भान या स्त्रीला आहे. त्यांच्या 'नातिचरामी' मधील स्त्री ही विवाहसंस्था नाकारते. या संस्थेने स्त्रीपुरुषांभोवती विचारप्रणालीचे जे जाळे विणले आहे ते तिला मान्य नाही. संसार ही ईश्वरदत्त देणगी आहे, ही गोष्ट या नायिका नाकारतात. त्यांच्यानायिका परंपरांना छेद देणा-या आहेत. स्त्रीपुरुष संबंधाच्या बदलत्या जाणिवांचा आविष्कार त्यांच्या साहित्यातून घडतो. या नायिका बुध्दीने सामान्य असल्यातरी त्यांची स्वतःची अशी जीवनविषयक तत्वे आहेत आणि त्या तत्वांना अनुसरून जीवन जगण्याची जिद्द त्यांच्या ठायी आहे. यादृष्टीने'आंधळयाच्या गायी','हंस अकेला' हे त्यांचे कथासंग्रह आणि 'नातिचरामी' ही कादंबरी महत्वाची आहे.

गौरी देशपांडे वा मेघना पेठे यांच्या नायिकांच्या तुलनेत सानियांनी रंगविल्या नायिका सौम्य वाटतात. ओळख, शोध, खिडक्या, यातील स्त्रिया स्वतःचे निर्णयस्वतः घेणाऱ्या आहेत. प्रत्येक स्त्रीला स्वतंत्रपणे जगण्याचा अधिकार आहे, यावर त्यांचा विश्वासआहे. परंतु त्या कोणतेही बंड करताना दिसत नाहीत. स्थलांतर, आवर्तन आणि अवकाश या त्यांच्या कादंबऱ्यातून त्यांच्या



228

Scanned by TapScanner

नायिका एक माणूस म्हणून स्थान मिळविण्याची धडपड करताना दिसतात. स्वतःतील सामर्थ्याचा शोध त्यांना महत्वाचा वाटतो. स्त्रियांच्या रुढप्रश्नांच्या पलीकडे या नायिका आपल्याला घेऊन जातात. प्राप्त परिस्थितीपुढे गुडघे टेकून त्या बसत नाहीत. त्यांचा स्वतःतील सामर्थ्याच्या शोधाचा प्रवास हा चालूच असतो. सानियांच्या कादंबऱ्या स्त्रीप्रधान असल्या, तरी त्यांच्या कादंबऱ्यांत पुरुषपात्रांविषयी हटवादी वा दुराग्रही भूमिका कोठे दिसत नाही.सामर्थ्यवान, समंजस पुरुषाची अपेक्षा बाळगणाया या स्त्रिया आहेत. जीवनाच्या प्रवासाबरोबरच त्यांचे मानसिक पातळीवरील घडत जाणारे परिवर्तन आणि या प्रवासातून त्यांचे हळूहळू सिध्द होत जाणे सानियांनी रेखाटले आहे. पुरुषांनाआततायी विरोध न करता स्वतःचा विकास घडवत नेणे त्यांच्या स्त्रियांना महत्वाचे वाटते. स्वतःच्या सन्मानाचे त्यांना भान आहे. विवाहसंस्थेची चौकट परिस्थितीनुरुप लवचिक होणे स्त्रीपुरुषांच्या सुखासाठी जरूरीचे आहे. असे एक सुत्र त्या आपल्या साहित्यातून मांडतात.

प्रिया तेंडूलकर यांचे कथालेखनही यादृष्टीने महत्वाचे आहे. ज्याचा त्याचा प्रश्न, जावे तिच्या वंशायामधून स्त्रीच्या वाटयाला येणारे उद्ध्वस्तपण, घटस्फोटातून येणारा एकाकीपणा त्या रंगवतात. छाया दातारयांनी स्त्रीवादी दृष्टिकोनातून स्वतंत्र असे लेखन केले आहे. वर्तुळाचा अंत, स्वतःला शोधताना या साहित्यकृतीयादृष्टीने महत्वाच्या आहेत.आशा बगे यांनीही माणसामाणसातील नात्याचा सूक्ष्म वेध घेतला आहे. स्त्रीमनाची सूक्ष्मातिसूक्ष्म आंदोलने त्यांनी रेखाटली आहेत. त्यांचा सेतू आणि भूमी याअंतर्मुख करणाऱ्या कादंबऱ्या आहेत.'रीटा वेलिणकर' ही शांता गोखले यांची कादंबरी प्रौढ कुमारिकेचे जगणे मांडताना स्त्रीवादी भूमिका विशद करतेअरुणासबाने यांनीही स्त्रीवादी भान ठेवून साहित्यलेखन केले आहे. त्यांचा अनुबंध, विमुक्ता या साहित्यकृतीचा यादृष्टीने विचारकरता येतो. प्रतिभा रानडे याचें बुरख्या आडच्या स्त्रिया', विद्या बाळ यांचे'शोध स्वतःचा', छाया दातार यांचे'मी बाई आहे म्हणून' ही अशी स्त्रीवादी विचार मांडणारी महत्वाची पुस्तके सांगता येतील. मोनिका गजेंद्रगडकर या सुध्दा अलिकडची स्त्रीरंगविताना दिसतात.

आत्मचरित्र या वाङःमय प्रकारातही स्त्रीवादी विचार अत्यंत ठसठशीतपणे व्यक्त होताना दिसतो. येथेविचार सुटा न येता जगण्यातून तो पाझरताना दिसतो. यादृष्टीने गोदावरी परूळेकर याचे 'जेंव्हा माणूसजागा होतो', सुनिताबाई यांचे 'आहे मनोहर तरी', मल्लिका अमरशेख यांचे 'मला उद्ध्वस्त व्हायचंय', बेबी कांबळेयांचे'जिणं आमुचं', हंसा वाडकर यांचे ''सांगत्ये ऐका', कमल पाध्येबंध-अनुबंध, कुमुद पावडे यांचे 'अंतःस्फोट', उर्मिला पवार यांचे 'आयदान' इ. अनेक आत्मचरित्रांचा स्त्रीवादाच्या संदर्भात विचार करावा लागेल.

कविता हा वाङःमयप्रकारही स्त्रीस्वातंत्र्याच्या जाणिवांनी समृध्द आहे. प्रभा गणोरकर, मल्लिका अमर शेख, मिना गजभिये, हिरा बनसोड, विजया राजाध्यक्ष, कविता महाजन, सुलभा हेर्लेकर, अनुराधा पाटील, अरूणा ढेरे, आसावरी काकडे, नीरजा यांनी आपल्या काव्याव्दारे स्त्रीच्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणिव करून दिली आहे. प्रज्ञा पवार हे आणखी एक महत्वाचे नाव. आपल्या

330



229

Scanned by TapScanner

कविता आणि कथाच्या व्दारे त्यांनी सभोवताली घडणाऱ्या विविध बदलांचे आणि त्यातील अंतर्विरोधाचे सूक्ष्म निरिक्षण केले आहे.

स्वतःच्या अस्तित्वासाठी संघर्ष करताना जागृत होत असलेली स्त्री, तिच्या नव्या जाणीवा, तिचेबदलते विश्व, तिची स्पंदने, तिचा प्रवास याचे चित्रण साहित्यातील सर्वच प्रकारातून होताना दिसते.सुरुवातीलारूढी, परंपरा आणि एकंदर व्यवस्थेने बध्द केलेल्या अवस्थेपासूनचा मुक्ततेकडे होणारा प्रवासते अभिव्यक्त करताना प्रारंभी तिचा सूर आणि भाषा ही अर्थातच आक्रमक, आकरताळेपणाची आणि एकंदरपुरुषविरोधी दिसते. नंतर स्त्रीच्या दुय्यमपणाचा शोध घेण्याचा प्रयत्नही दिसतो. पितृसत्ताक व्यवस्थेतून आलेल्या प्रेम, त्याग, सहनशीलता यासारख्या मिथकांना त्या नाकारतात. पावित्र्याच्या, नैतिकतेच्या कल्पनाज्या स्त्रियांना बध्द ठेवत आल्या आहेत,त्यास्त्रीवादी साहित्यातून नाकारल्या आहेत. आपल्या मर्यादितअवकाशातून बाहेर येत नवा आशय, नवा अनुभव, नवी क्षितिजे शोधण्याचा स्त्रीचा प्रयत्न आहे. त्याचेआविष्करण स्त्रीवादी साहित्यामधून होताना दिसते. त्याचप्रमाणे स्त्रियांचा संघर्ष, त्यांचा अवमान, पुरुषप्रधानमूल्याधिष्ठित व्यवस्थेत स्त्रीला मोजावी लागलेली किंमत हे सारे जगासमोर मांडण्याचा प्रयत्न या साहित्यातूनहोताना दिसतो.

रूढी, परंपरा, संस्कृती आणि एकंदर समाजव्यवस्थेने दिलेली ओळख डोळस दृष्टीकोन स्वीकारत जागृत झालेल्या स्त्रीला मान्य नाही. जे आहे ते तसेच न स्वीकारता त्यात बदल व्हायला पाहिजे, हीच त्यामागची भूमिका आहे. जग बदलले पाहिजे या व्यापक सामाजिक जाणिवेतून हे लिखाण होताना दिसते.एकोणिसाव्या शतकात स्त्रीवाद हा शब्द न वापरता ताराबाई शिंदेंनी स्त्रीवादाची मांडणी करत'स्त्रीपुरुषतुलना' सारखे पुस्तक लिहिले. त्यानंतरच्या काळात लक्ष्मीबाई टिळक, बहिणाबाईचौधरी, कुसुमावती देशपांडे, विभावरी शिरुरकर, इंदिरा संत, पदमा गोळे, गौरी देशपांडे, कमल देसाई, सानिया, आशा बगे, मेघना पेठे, शांता गोखले, प्रतिभा रानडे, छाया दातार, विद्या बाळ, मल्लिका अमरशेख, कविता महाजन, आसावरी काकडे, नीरजा, उर्मिला पवार यांनी स्त्रीजीवनासंदर्भात अनेक पातळयांवरचे प्रश्न उपस्थितकरण्याचा प्रयत्न केला आणि त्याला उत्तर शोधण्याचा वा पर्याय शोधण्याचाही त्यांचा प्रयास त्यांच्यासाहित्यातून दिसतो. या सर्व स्त्रिया स्त्रीजीवनासंदर्भात लिहिताना स्त्री ही व्यवस्थेची बळी आहे, अशा भूमिकेतून लिहित नाहीत. रडका सूर लावण्याचा त्यांचा मानस नाही तर स्त्रीजीवनात परिवर्तन त्याना अपेक्षित आहे. एक माणूस म्हणून स्वतःकडे वा स्त्रीकडे त्या पाहतात आणि समाजानेही याच दृष्टीने त्यांच्याकडे पहावे हा त्यांचा दृष्टीकोन आहे. स्वसामर्थ्याचा प्रतिभाविष्कार या साहित्यातून दिसतो. नव्या राष्ट्राच्या उभारणीतस्त्रियांची भूमिका ही परंपरागत न राहता कणखर असावी. पितृसत्ताक वा पुरुषप्रधान मूल्यव्यवस्थेनेझाकोळलेली, अस्तित्वहीन असू नये तर स्वअस्तित्वाचे, स्वजबाबदाऱ्यांचे भान असलेली अशी जाणीव या साहित्याच्या आविष्कारातून दिसते.



Scanned by TapScanner

स्त्रीवादी साहित्य हे स्त्रियांची भाषा ही नव्याने घडवताना दिसते. आपले विचार मांडताना कधी ही भाषा आक्रमक, स्फोटक होताना दिसते. बंडखोरीचा सूर लावते. आपले विचार वा भावना व्यक्त करताना जिला पुरुषी भाषा म्हणून ओळखले जाते अशी भाषा स्त्रिया या साहित्याव्दारे वापरताना दिसतात. भाषेवरचीपुरुषी मक्तेदारी स्त्री लेखिकांनी मोडून काढली आहे. भाषेच्या साहयाने आपले विचार त्या निर्भयतेने मांडतानादिसतात. प्रस्थापित पुरुषप्रधान व्यवस्थेचा प्रतिकार करताना ती टोकदार बनताना दिसते. तथापि पुरुषप्रधान मूल्यव्यवस्थेचा प्रतिकार करताना स्त्रीवादी साहित्याची भूमिका ही पुरुषविरोधी नाही. तर रूढी, परंपरा,पारंपरिक संकेत, अनैतिकतेची कल्पना, स्त्रियांवर होणारे अन्याय, अत्याचार याविषयी प्रतिकाराची आहे. बध्दतेपासून मुक्ततेकडे जाणारा हा प्रवास आहे. समाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलावा हाही दृष्टीकोन समोर ठेवून निर्माण झालेले हे साहित्य समाज परिवर्तनाच्या दृष्टीने महत्वाचे आहे.

## संदर्भ ग्रंथः–


1. भारतातील महिला विकासाची वाटचाल– ज. शं. आपटे, पुष्पा रोडे
2. भारतातील संदर्भातून स्त्रीवाद– शोभा नाईक
3. साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह– डॉ. शरणकुमार लिंबाळे
4. सत्यशोधकी स्त्रीवाद– प्रा. नूतन माळवी
5. स्त्रीवादः एक दृष्टीक्षेप –अरुणा सबाने


330

Co - Ordinator IQAC
Arts & Science Mahila Mahavidyalaya
Mehkar, Dist. Buldana



Scanned by TapScanner